रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ४६
www.ramprahar.com
मंगळवार, २ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

दिवा-सावंतवाडी एक्सप्रेसला पेण थांब्यासाठी प्रक्रिया सुरू/२
तरुणीशी जवळीक; रिक्षाचालकावर गुन्हा/५
वृद्धेचा खून करणाऱ्या आरोपीला बेड्या/७

## अफगाणिस्तानमध्ये भूकंप; आठशे जणांचा मृत्यू



**काबूल** : अफगाणिस्तानात पुन्हा एकदा भीषण भूकंप झाला आहे. अफगाणिस्ताच्या पूर्वेकडील भागात रविवारी रात्री उशिरा ६.० तीव्रतेचा भीषण भूकंप झाला. यामध्ये किमान ८०० लोकांचा मृत्यू झाला असून २,५०० लोक जखमी झाले आहेत. ढिगाऱ्यांखालून नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकांकडून शोध घेतला जात आहे. अमेरिकन जिओलॉजिकल सर्व्हेने दिलेल्या माहितीनुसार स्थानिक वेळेनुसार रात्री ११.४७ वाजता हा भूकंप झाला. या भूकंपाचे केंद्र हे नांगरहार प्रांतातील जलालाबादपासून सुमारे २७ किलोमीटर ईशान्येला होते. फक्त आठ किलोमीटर खोलीवर झालेल्या भूकंपामुळे कुनार प्रांतात मोठी हानी झाली आहे. येथे मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. बचाव व मदतकार्य सुरू असून मृतांची संख्या वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

# हैदराबाद गॅझेटचा प्रारूप मसुदा तयार

### अंमलबजावणीसंदर्भात मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत चर्चा




**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मुंबईत मनोज जरांगे पाटील यांचे आमरण सोमवारी (दि. १) चौथ्या दिवशीही सुरू राहिले. दुसरीकडे सरकारकडून बैठकांचा सिलसिला चालू होता. त्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याबाबत सरकार सकारात्मक असून याबाबत प्रारूप मसुदा तयार करण्यात आल्याची माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षणासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक सोमवारी झाली. या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह मंत्रिगण उपस्थित होते. या वेळी आंदोलकांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी विविध पर्यायांचा विचार करण्यात आला. या संदर्भात माध्यमांशी बोलताना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले की, मराठा आंदोलनाबाबत मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. हैदराबाद गॅझेटबाबत कायद्याच्या चौकटीत राहून काय तोडगा काढता येईल त्यावर सविस्तर चर्चा सुरू आहे. महाधिवक्ते या बैठकीला होते, परंतु हायकोर्टात सुनावणी असल्याने त्यांना तिथे जावे लागले. आता कोर्टाने काय निर्देश दिलेत ते पाहू. त्यानंतर पुन्हा बैठक घेऊन पुढील कार्यवाही करू.

## मुंबईतील रस्ते मोकळे करा; हायकोर्टाचे निर्देश



**मुंबई** : आझाद मैदान वगळता इतर कुठेही आंदोलक नको. त्याशिवाय दक्षिण मुंबईतील रस्ते उद्या दुपारी ४ वाजेपर्यंत रिकामे करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्याचप्रमाणे आणखी आंदोलक मुंबईत येण्याचा प्रयत्न करत असतील, तर त्यांना मुंबईच्या बाहेर थांबवावे, अशा सूचना हायकोर्टाने दिल्या आहेत.

मराठा आरक्षणाची मागणी करत मनोज जरांगे-पाटील मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषणाला बसले आहेत. या आंदोलनाविरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या वेळी हायकोर्टात आंदोलकांचे वकील, याचिकाकर्ते, राज्य सरकार आणि पोलिसांनी आपापला युक्तिवाद मांडला. दीड तासाहून अधिक काळ या आंदोलनावर सुनावणी झाली. त्यात आमरण उपोषणाला परवानगी दिली नव्हती, असे कोर्टाने म्हटले. याशिवाय पाच हजारांहून अधिक लोक आणू नये याची जबाबदारी आयोजकांची होती, असे निरीक्षण नोंदवत कोर्टाने नियमाचे उल्लंघन झाल्याने नाराजी व्यक्त केली.

या सुनावणीवेळी आझाद मैदानाव्यतिरिक्त इतर ठिकाणी आंदोलकांनी वावरू नये, पाच हजारांपेक्षा जास्त आंदोलक नको, सामान्य मुंबईकरांना त्रास होईल असे काही नको, असे हायकोर्टाने सांगितले. दरम्यान, जेवण आणि पाणी आणण्यास तात्पुरती परवानगी कोर्टाने दिली आहे.

सगळ्यांनाच आंदोलनाचा अधिकार आहे, पण कोर्टाने दिलेल्या नियम आणि अटींचे पालन करावेच लागेल. मुंबईतील रस्त्यांवर आंदोलन नको, आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी आहे. मनोज जरांगे पाटील यांची तब्येत बिघडल्यास त्यांना तत्काळ उपचार द्यावे, असेही हायकोर्टाने म्हटले.

या वेळी सरकारने आपली बाजू मांडताना सांगितले की, नियमाला अधीन राहून परवानगी देण्यात आली होती. नियमानुसार आंदोलन करण्याचे मान्य करण्यात आले होते, पण हे प्लॅन करून करण्यात आले आहे. आंदोलनकर्ते ऐन गणपतीत आले. गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणे पोलिसांसाठीदेखील कठीण आहे. तरी आम्ही समतोल पाळण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान, आंदोलनावर मंगळवारी दुपारी ३ वाजता पुन्हा सुनावणी होणार आहे.

## कोर्टाच्या निर्णयाचे पालन करू -जरांगे

**मुंबई** : आम्ही न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करणार आहोत. ज्याला ऐकायचे नाहीय त्याने गावाकडे गेले तरी चालेल, असे मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी कोर्टाच्या आदेशावर भाष्य करताना म्हटले आहे.

आंदोलकांनी मैदानात जावे, तिथेच गाड्या लावाव्यात. मला दोन दोन घोट पाणी पिऊन तुमच्याशी बोलावे लागत असेल तर तुमचा काय उपयोग, असा सवाल जरांगे यांनी केला. अंतरवालीतही हेच आंदोलक होते. मुंबईला आणि मुंबईकरांना त्रास होऊ नये असे वागा, असेही त्यांनी सांगितले.

## मिरची गल्लीचा राजा



(छाया : करण वाडूळकर)

पनवेल : स्वराज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने प्रतिष्ठापना केलेला मिरची गल्लीचा राजा.

## निवडक

### लिव्ह-इन पार्टनरला पेट्रोल ओतून जिवंत जाळले

**बंगळुरू** : येथे एका व्यक्तीने त्याच्या लिव्ह-इन पार्टनरची जिवंत जाळून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ३५ वर्षीय महिला नातेवाईकासह मंदिरातून कारमधून परतत होती. आरोपीने सिग्नलवर गाडी थांबवली, तिच्यावर पेट्रोल टाकले आणि पेटवून दिले. महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, तिथे सोमवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. मृत महिलेचे नाव वनजाक्षी, तर आरोपीचे नाव विठ्ठल आहे. तो व्यवसायाने कॅब ड्रायव्हर आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

### जीएसटी संकलनात गतवर्षीच्या तुलनेत वाढ

**नवी दिल्ली** : देशातील वस्तू व सेवा कर (जीएसटी) संकलन ऑगस्टमध्ये १.८६ लाख कोटी रुपयांवर पोहचले. गेल्या वर्षीच्या ऑगस्टच्या तुलनेत त्यात ६.५ टक्के वाढ नोंदल्याचे सोमवारी (दि. १) सरकारी आकडेवारीतून समोर आले.

## रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!



पनवेल : बोचासणवासी श्री अक्षरपुरुषोत्तम पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईच्या वतीने खारघर येथे रक्तदान महायज्ञ २०२५ आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन आयोजकांसह रक्तदात्यांचे कौतुक केले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते.

## तीन दिग्गज नेते एका फ्रेममध्ये

### पीएम मोदी, पुतिन, जिनपिंग यांची 'एससीओ'त भेट



**तियानजिन (चीन) : वृत्तसंस्था**

चीनमधील तियानजिन येथे जगातील तीन शक्तीशाली देशांच्या प्रमुखांची भेट झाली. त्यामुळे या भेटीची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीने नवीन समीकरण उदयास येण्याची शक्यता आहे.

एससीओ बैठकीदरम्यान सोमवारी (दि.१) पीएम मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन व जिनपिंग या नवीन जागतिक व्यवस्थेतील तीन दिग्गजांची भेट झाली. यासंबंधीचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर होत आहे. या व्हिडीओत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन पंतप्रधान मोदींभोवती उभे आहेत. तिन्ही राष्ट्रप्रमुख त्यांच्या अनुवादकासोबत हलक्याफुलक्या वातावरणात बोलत आहेत. तिन्ही नेत्यांच्या एकत्र येण्याने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची झोप उडण्याची चिन्हे आहेत.

या वेळी चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांनी २०हून अधिक देशातील नेत्यांच्या उपस्थितीत जागतिक व्यवस्थेतील गुंडगिरी वर्तनावर कडक टीका केली. हा रोष अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाविरोधात असल्याचे दिसून आले.

## महिलांकडून गौरीचे मनोभावे पूजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणरायानंतर रविवारी (दि. ३१) गौराईचे आगमन झाल्यावर सोमवारी महिलांनी मोठ्या भक्तिभावाने तिचे पूजन केले. गौरी पूजनानिमित्त महिलावर्गात उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. यानंतर मंगळवारी (दि.२) गौरी गणपतींचे विसर्जन केले जाणार आहे.



सध्या कोकणात गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. मुंबईकर चाकरमानी मोठ्या संख्येने कोकणात आले आहेत. गणपतीपाठोपाठ गौराईचे रविवारी आगमन झाल्याने गणेशोत्सवाचा उत्साह टिपेला पोहचला आहे. वाजतगाजत आणलेल्या गौरी सजविण्यात आल्या, दागदागिन्यांनी मढविण्यात आल्या. त्यांची पूजा आरती करण्यात आली. त्यानंतर गौराईला भाजी भाकरी आणि दह्याचा नैवेद्य दाखवण्यात आला. रात्री गौराईच्या पुढे महिलांची नाचगाणी, झिम्मा फुगडी रंगली. एकूणच गौराई आल्याने महिलांमध्ये उत्साहाला उधाण आल्याचे पहायला मिळत आहे.

गौरी पूजनाचा दिवस महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. बांबूच्या सुपामध्ये विविध वाण साहित्य, पत्री, फळे ठेवून त्याने गौरीची पूजा करण्यात आली. नवविवाहितांसाठी गौरीपूजन एक विधीच असतो. यंदा पूर्वा नक्षत्रावर गौरींचे आगमन झाल्याने नवविवाहितांचे ओवसे करण्यात आले. यासाठी नवविवाहिता माहेरी आल्या असून माहेरच्या गौरीचे त्यांनी पूजन केले. फुले, फळे, पत्री आदी वस्तूंनी भरलेल्या सुपांनी गौरीची ओटी भरण्यात आली. अशी सुपे जवळच्या नातेवाईकांना भेट देण्यात आली. गौरीला गोडाधोडाचा नैवेद्य दाखवण्यात आला. काही ठिकाणी गौराईला तिखटाचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा आहे.

रायगड जिल्ह्यात अलिबाग, उरण, मांडवा, आक्षी, मुरूड, श्रीवर्धन आणि रेवदंडा येथील समुद्रकिनाऱ्यावर गौरी गणपतींचे विसर्जन करण्यात येणार असून इतर ठिकाणी नदी, तलावात विसर्जन केले जाणार आहे. विसर्जन शांततेत आणि सुरळीतपणे पार पडावे यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेतली जाते आहे.



दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलसोबत यंदाचा गणेशोत्सव साजरा करा...

गणेशोत्सव बुधवार, दि.27 ऑगस्टपासून सुरू झाला आहे. या पर्वणीत आपल्या गणपतीचा फोटो दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलवर **विनामूल्य** प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे आपण आपल्या बाप्पाचा फोटो, सोबत **आपले नाव व पत्ता ramprahar@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवा.** फोटो चांगला असल्यास त्याला रामप्रहर आणि मल्हार चॅनेल या दोन्ही ठिकाणी विनामूल्य प्रसिद्धी देण्यात येईल.

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद
मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...
ramprahar@gmail.com

# आयुष्मान कार्डसंदर्भात पनवेल महापालिकेची विशेष मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका विशेष मोहिम राबवित आहे. यासाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यास लोकप्रतिनिधींची बैठक सोमवारी प्रसेनजित कारलेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही बैठक घेण्यात आली.

मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी यावेळी आयुष्यमान कार्डचे महत्व लोकप्रतिनिधींना सांगितले. तसेच यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती सांगितली. महापालिकेच्यावतीने आयुष्यमान कार्डसाठी काढण्यासाठी प्रभागनिहाय शिबीरे भरविण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी रेशन कार्डला आधार कार्ड लिंक असणे गरजेचे आहे. आयुष्यमान कार्ड काढण्याआधी रेशन कार्ड आधार कार्ड लिंक करण्यासाठीच्या शिबीरांचे आयोजन करणे महत्वाचे असल्याचे लोकप्रतिनिधींनी सांगितले.



यावेळी लोकप्रतिनिधींनी दिलेल्या सूचनांचे स्वागत करून आयुष्यमानकार्ड शिबीरांबरोबरच रेशन कार्ड आधार कार्ड लिंक करण्यासाठी शिबीरांचे आयोजन करण्याबाबत महसूल विभागासोबत चर्चा करून शिबिराचे नियोजन करण्यात येईल असे उपायुक्त कारलेकर व मुख्य आरोग्य अधिकारी यांनी सांगितले.

### 'एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'

जिल्ह्यातील नागरिकांना 'एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' (एबी-पीएमजेएवाय) 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना' (एमजेपीजेएवाय) यांचा लाभमिळावा, यासाठी पालिका प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत नागरिकांना 'आयुष्मान भारत गोल्डन कार्ड' तयार करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार असून, यामध्ये एक हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व विशेष उपचारांचा समावेश आहे.

# सरकारी जमिनीची परस्पर अभिनेत्री सुहाना खानला विक्री

## वस्तुनिष्ठ अहवाल सादर करा, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थळ येथील ना विक्री कलमा अंतर्गत लागवडीसाठी मंजूर केलेली जमीन परस्पर विकल्याचे एक प्रकरण समोर आले आहे. फळबाग लागवडीसाठी देण्यात आलेली ही जमीन अभिनेत्री सुहाना शाहरूख खान हिला विकण्यात आल्याने, या प्रकरणला महत्वप्राप्त झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने २०२३ मध्ये नोंदणीकृत साठे कराराच्याव्दारे विक्री झालेल्या या जमिनीची दोन वर्षानंतर आता चौकशी सुरू केली आहे. अलिबाग तहसिलदारांना याबाबतचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

दक्षिण मुंबईला सागरी मार्गाने थेट जोडले गेल्याने, अलिबाग मधील जागा जमिनींना सध्या सुगीचे दिवस आले आहेत. अनेक देशभरातील नामांकीतांनी अलिबाग मध्ये जागा जमिनींची खरेदी सुरू केली आहे. यात तारे तारकांचाही समावेश आहे. अभिनेता शाहरूख खान, जुही चावला, विराट कोहली, अनुष्का शर्मा, रणवीर सिंग दिपीका पादुकोण, राम कपूर, अक्षय खन्ना, क्रिती सेनॉन यांच्या पाठोपाठ अभिनेत्री सुहाना शाहरुख खान हिने देखील अलिबाग तालुक्यातील थळ येथील जागा खरेदी केली होती. मात्र आता सुहाना खान हीने खरेदी केलेली जमिन वादात सापडली आहे.

कारण १९६८ साली थळ येथील येथील सर्वे नंबर ३४५/२ मधील ०.६०.७० हेक्टर जमिन लागवड आणि वापरासाठी नारायण विश्वनाथ खोटे यांना शासनाकडून देण्यात आली होती. सदर जमिन देतांना ही जमिन जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय गहाण, विक्री अथवा इतरांच्या नावावर करता येणार नाही अशी अट घालण्यात आली होती. मात्र नारायण खोटे यांच्या वारसांनी ही जमिन जिल्हाधिकारी यांची परवानगी न घेताच परस्पर अभिनेत्री सुहाना खान हीला नोंदणीकृत साठे कराराव्दारे १२ कोटी ९१ लाख रुपयांना विकल्याचे समोर आले आहे. या विक्री व्यवहारावर अलिबाग मधील अॅड विवेक ठाकूर यांनी आक्षेप घेतला आहे. जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय हा साठेकरार झाला असल्याने, हा व्यवहार रद्द करावा, संबधितांवर कारवाई करावी आणि सदर जमिन अटी व शर्ती यांचा भंग केल्याने शासन जमा करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने दोन वर्षांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. अलिबागच्या तहसिलदारांना या प्रकरणी दोन दिवसात वस्तूनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी जारी केले आहेत. त्यामुळे तहसिलदारांच्या अहवालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आ. मंदा म्हात्रेंच्या कार्याने प्रभावित महिलांचा भाजपत प्रवेश



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर हे झपाट्याने विकासाच्या मार्गाने जात आहे. बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे या तत्पर कार्यशील असतात. बेलापूर मतदारसंघामध्ये आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नांमुळे होत असलेल्या विकासकामांची प्रचीती पाहून स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षात सामील होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बेलापूर येथील समाजसेविका छाया जाधव तसेच इतर महिलांनी भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थित भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

या प्रसंगी आ. मंदा म्हात्रे यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे मनः पूर्वक स्वागत करताना सांगितले की,भारतीय जनता पक्ष हा विकास आणि जनसामान्यांच्या हितासाठी सातत्याने कार्य करणारा पक्ष आहे. नागरिकांचा विश्वास हीच आमची ताकद असून, या विश्वासाला न्याय देणे हीच आमची जबाबदारी आहे. पक्ष प्रवेशामुळे भारतीय जनता पार्टीची ताकद आणखी वाढल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# गालसुरे-साखरी रस्ता खड्डेमय

## प्रवाशांचा प्रवास संकटमय

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुका मागील काही वर्षांत पर्यटन नकाशावर ठळकपणे झळकू लागला आहे. दिघीपासून कोलमांडला पर्यंतचे मुख्य रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच अंतर्गत ग्रामीण रस्ते जिल्हा परिषद बांधकाम विभागाने विकसित केल्याने तालुक्यातील प्रवास काही प्रमाणात सुखकर झाला आहे. रुंदीकरण व काँक्रीटीकरणामुळे अनेक ठिकाणी रस्ते चांगल्या स्थितीत आले असले तरी काही महत्त्वाच्या मार्गांची अवस्था मात्र बिकट आहे.



विशेषत: श्रीवर्धन तालुक्याला थेट मुंबई-गोवा महामार्गाशी जोडणाऱ्या गालसुरे-महाड खाडी मार्गावरील गालसुरे ते साखरी रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले असून वाहनचालक आणि प्रवासी वर्गाला प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

रस्ते विकास योजनेतून जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून प्र.जि.मा. ४ या मार्गावर गालसुरे ते राष्ट्रीय महामार्ग-९९ (महाड खाडी) असा १० किलोमीटर लांबीचा व ३.७० मीटर रुंद रस्ता विकसित करण्यात आला होता. हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा समजला जातो कारण त्याद्वारे म्हसळा तालुक्यातील आंबेत, रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व मंडणगड तालुका तसेच म्हाप्रळमार्गे महाड तालुका आणि पुढे मुंबई-गोवा महामार्गाशी थेट संपर्क साधता येतो.

मात्र, सध्या गालसुरे ते साखरी या फक्त तीन किलोमीटरच्या पट्ट्यात असंख्य खड्डे झाल्याने वाहनचालकांना अक्षरशः कसरत करत प्रवास करावा लागत आहे. हा मार्ग दुर्गम व डोंगराळ भागातील अनेक खेड्यांना जोडणारा आहे. आडी, कारिवणे, धारीवली, साखरोणे, वडशेत, वावे, जावेळे व साखरी अशी गावे याच रस्त्याने श्रीवर्धनशी जोडली गेली आहेत. हरिहरेश्वर व बागमंडला या पर्यटनस्थळांकडे जाण्यासाठी देखील हा रस्ता पर्यायी मार्ग मानला जातो.

परंतु, पावसाळ्यात अनेकदा रस्त्यावरून पाणी वाहू लागल्याने वाहतुकीसाठी तो बंद करावा लागतो. तसेच मुंबई-गोवा महामार्गाशी असलेली जोडणी लक्षात घेता या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण व मजबुतीकरण करणे अत्यावश्यक आहे.

# सानपाडा येथील पदपथ ढासळला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कंत्राटदारांच्या कामाचा निकृष्ट दर्जा काय असतो याचे उदाहरण सानपाडा येथे दिसून येत आहे. सेक्टर १० आणि नाल्याच्या मधील रस्त्यालगत असलेल्या गटारावरील पदपथाचा काही भाग खचून त्याचा मलबा गटारात पडला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीची वातावरण पसरले आहे. शिवाय पडलेला राडारोडा काढून त्याच ठिकाणी रस्त्यावर टाकण्यात आला आहे. या ठिकाणी हिरवी जाळी लावून पदपथचा वापर करण्यास अटकाव केला असला तरी घाई गडबडीत अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना रस्त्यावरून चालण्याची सक्ती असल्याचे चित्र दिसत आहे.



जुईनगर रेल्वे स्थानकातून बाहेर पडल्यावर सेक्टर, ११, १०, ७, ६ आणि ५ या परिसरात जाणाऱ्या नागरिकांचे प्रमाण अधिक आहे. त्यात सेक्टर १०, ६ आणि ५ येथील नागरिक याच पदपथाचा वापर करतात. मात्र येथील पदपथ घसरल्याने नागरिकांना अपघाताचा धोका स्वीकारत रस्त्याने ये-जा करावी लागत आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहने पार्क करण्यात येतात. येथील रस्ता खड्डेरहित असल्याने या ठिकाहून वाहने देखील वेगाने धावत असतात. अशा वेळी उर्वरित रस्त्याने चालताना नागरिकांना जीव मुठीत धरून चालावे लागते.

या परिसरात डी मार्ट असल्याने मोठ्या प्रमाणात नागरिक येथे बाजारहाटासाठी येत असतात. त्यात महिलांचे प्रमाण अधिक असून बाजाराच्या पिशव्या घेऊन चालताना कमालीची कसरत करावी लागत असल्याचे महिला वर्गानी सांगितले.

# कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य -जिल्हाधिकारी किशन जावळे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आपल्याला कर्मयोगी व्हायचे असल्यास सतत शिकत राहणे आवश्यक आहे. कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य आहे. शासकीय कामकाजातील नोटिंग, टिप्पणी, फायलिंग यांसारख्या मूलभूत बाबी प्रत्येक कर्मचाऱ्याने आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सेवाविषयक बाबींच्या पुर्तता मेळाव्याचे आयोजन जिल्हा नियोजन भवन येथे करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा



भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, नगर पालिका प्रशासन अधिकारी विराज लबडे, सह-जिल्हा निबंधक श्रीकांत सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जावळे म्हणाले की, अनुकंपा भरतीसंदर्भात शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत जुने ४५ जीआर रद्द करून नवे धोरण लागू केले असून, त्या धोरणानुसार जिल्ह्यातील ग्रामविकास, नगरविकास, पोलीस तसेच इतर सर्व शासकीय विभागांतील प्रलंबित उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त उमेदवारांनी जनसेवेची ही संधी मनापासून आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्षमतेने पार पाडावी. तसेच काही कर्मचाऱ्यांना कालबाह्यबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आला असून, सर्व विभागांनी हा लाभ जानेवारी महिन्यात देण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील १ हजार ३९० कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके डिजिटायझेशन झाली असून त्यांना सेवार्थ क्रमांक जोडण्याची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी

# राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थेत राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई येथे राष्ट्रीय क्रीडा दिन शुक्रवार दिनांक २९ सप्टेंबर २०२५ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी भारतात साजरा केला जातो. हा दिवस हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. त्यांच्या खेळामुळे भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा सन्मान मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी खेळाचे महत्त्व सांगताना विशेषतः दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.



या कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून ब्रायडन रॉड्रिग्स व जोआन रॉड्रिग्स उपस्थित होते. या दोघांना स्वमग्रता असली तरी बहुगुणी खेळाडू व कलाकार आहेत. स्केटिंग, पोहणे, मॅरेथॉन धावणे तसेच चित्रकला आदी क्षेत्रात त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळवले आहेत. त्यांच्या नावे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशिया पॅसिफिक रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडिया मध्येही नोंदी झाल्या आहेत. त्यांच्या आई-वडिलांनी मुलांच्या जिद्दीचा प्रवास सांगून पालकांना मार्गदर्शन केले. प्रत्येक मुलात वैशिट्यपूर्ण ताकद व गुण असतात, फक्त त्यांच्यातील असलेली प्रतिभा व आवड ओळखून प्रोत्साहन द्यायला हवे, असा संदेश त्यांनी दिला.

संस्थेमध्ये या दिवशी विशेष मुलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. त्यात टेबल टेनिस, स्पीड वॉकिंग आणि मजेदार खेळ यांचा समावेश होता. विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात आले.

तसेच विद्यार्थ्यांसाठी क्रीडा प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. त्यातून त्यांना खेळ व क्रीडा व्यक्तिमत्वांबद्दल माहिती मिळाली.

या वर्षीचा क्रीडा दिन केवळ खेळांचा नव्हता, तर जागरूकता, सशक्तीकरण आणि पालक-समुदाय सहभाग यांचाही एक सुंदर संगम ठरला. या कार्यक्रमातून राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था नवी मुंबईचे सर्वसमावेशकता व प्रत्येक मुलाच्या विविध क्षमतांचा सन्मान करण्याचे ध्येय अधोरेखित झाले.

# ६ ऑक्टोबर रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे सप्टेंबर महिन्याच्या लोकशाही दिनी सादर १ निवेदनावर आयुक्त महोदयांच्या दालनात संबधित अधिकारी यांच्या समक्ष सुनावणी घेण्यात आली.

माहे ऑक्टोबर महिन्याचा लोकशाही दिन दि. ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. १९ सप्टेंबर २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

सदर अर्जात नमूद तक्रार , निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे, देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत

# दिवा-सावंतवाडी एक्सप्रेसला पेण थांब्यासाठी प्रक्रिया सुरू

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणारा निर्णय घेण्याच्या दिशेने पाऊल उचलण्यात आले आहे. खासदार धैर्यशील पाटील यांनी दिवा सावंतवाडी रेल्वेला पेण रेल्वे स्थानकात थांबा मिळावा म्हणून रेल्वे मंत्र्याकडे केलेल्या मागणीवर रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत दिवा-सावंतवाडी सिंधुदुर्ग एक्सप्रेस या गाडीचा पेण येथे थांबा देण्याबाबत सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत. त्यामुळे लवकरच सदरचा प्रश्न मार्गी लागणार आहे.खासदार पाटील यांनी १९ मार्च २०२५ रोजी यासंबंधी पत्र पाठवून पेण तालुक्यातील प्रवाशांची अडचण अधोरेखित केली होती.

# अमीर हाडकर यांच्या घरी गणपतीसाठी अवतरली पंढरी

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्राची हास्य जत्रामधील रायगड जिल्ह्याचे सुपुत्र संगीतकार अमीर हाडकर यांच्या घरी यंदा मूर्तीला विठ्ठलाचे रूप दिले असून साक्षात घरी पंढरी अवतरली.

दरवर्षीप्रमाणे यंदाची मूर्तीदेखील मातीची असून वेदांत याने साकारली आहे. मूर्ती आम्ही घरीच बनवतो. माझ्या भावाचा मुलगा वेदांत मूर्ती घडवतो. मूर्तीत विठ्ठलाचे रूप असल्याने पूर्ण कुटुंबाने वारकरी वेष परिधान करून बाप्पाचे स्वागत करुन या वारीत सहभागी झालो, असे त्यांनी सांगितले.



## संपादकीय

# सहकार्याचे नवे पर्व

अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर भारत–चीन संबंध अधिक दृढ करण्याला वेग मिळाल्याचे दिसते आहे. ताजी चर्चा दोन्ही देशांना परस्पर सहकार्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे नेणारी नक्कीच आहे तसेच दोन्ही देशांच्या नेत्यांनी सीमेवर शांतता निर्माण होण्यावर भर दिला हेही महत्त्वाचे आहे.

**जागतिक व्यापार स्थिर करण्यामध्ये योगदान देण्याची गरज लक्षात घेऊन व्यापार आणि गुंतवणुकीतील संबंध वाढवू अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी रविवारी दिली. भारत आणि चीन एकमेकांचे सहकारी भागीदार आहेत, प्रतिस्पर्धी नव्हेत अशी भूमिकाही यावेळी अधोरेखित केली गेली. तियान्जिन येथे आयोजित शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) २५व्या वार्षिक शिखर परिषदेच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. चीन आणि भारत प्राचीन संस्कृती असलेले देश आहेत. जग सध्या मोठ्या बदलाकडे वाटचाल करते आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले हे दोन्ही देश यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. सीमाभागात शांतता महत्त्वाची आहे तसेच सीमावादावरून दोन्ही देशांचे संबंध ठरवले जाऊ नयेत. ड्रॅगन आणि हत्ती एकत्र येणे महत्त्वाचे आहे यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला. भारताने रशियाकडून स्वस्तात खनिजतेल विकत घेणे ट्रम्प यांना खुपले. चीन तर रशियन खनिज तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार आहे. जागतिक व्यापारातील संबंधित घडामोडींच्या पार्श्वभूमीवरच पंतप्रधान मोदींचा सात वर्षांनंतर केलेला चीन दौरा महत्त्वाचा मानला गेला. जपान आणि चीन या दोन्ही देशांच्या नेत्यांशी मोदींनी या विदेश दौऱ्यात चर्चा केली. ती व्यापार–सहकार्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरेल. मोदींनी जिनपिंग यांच्यासोबतचा संवाद फलदायी झाल्याची भावना समाजमाध्यमावर व्यक्त केली. थेट विमानसेवा, व्हिसा सुविधा, कैलास मानसरोवर यात्रा यांसारख्या माध्यमांतून नागरिकांमधील आपापसांतील संबंध वाढवण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. कझानमधील भेटीपासूनच्या भारत आणि चीन सकारात्मक संबंधांचा आढावा चर्चेत घेण्यात आला व सहकार्यास कटिबद्ध असल्याचे दोन्ही देशांकडून मान्य करण्यात आले. २०२० साली पूर्व लडाखमध्ये झालेल्या लष्करी संघर्षानंतर गेल्या वर्षीपासून संबंध सुरळीत करण्यासाठी दोन्ही देशांकडून प्रयत्न सुरु आहेत. १९६२ पासून द्विपक्षीय संबंधांत निर्माण झालेली तेढ दूर करण्यासाठी भारत आधीपासूनच प्रयत्नशील आहे, परंतु चीनकडून सीमाभागात होणाऱ्या उपद्रवामुळे या प्रयत्नांना फारसे यश मिळाले नाही, पण दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल आता उचलले गेले आहे. ट्रम्प यांच्या 'संरक्षणवादी' भूमिकेमुळे भारत–चीन दरम्यानच्या संबंधांमध्ये सकारात्मक बदल झाले तर ते दोन्ही देशांच्या हिताचे ठरेल. दोन्ही देशांनी एका दिशेने एकत्र वाटचाल केली पाहिजे. त्यातूनच द्विपक्षीय संबंध दीर्घकाळासाठी दृढ होतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ड्रॅगन आणि हत्ती एकत्र येणे महत्त्वाचे आहे याचा सूचक उल्लेख क्षी जिनपिंग यांनी केला. मोदींनीही त्यावर भर दिला. भारत–चीन संबंधांमध्ये सातत्याने प्रगती होण्यासाठी सीमावर्ती भागात शांतात आवश्यक आहे याकडे मोदींनी लक्ष वेधले. दहशतवाद, बहुस्तरावरील न्याय्य व्यापार यांसारख्या मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमध्ये एकमत झाले. अमेरिकेने निव्वळ स्वत:चे हितसंबंध जोपासण्याच्या दृष्टिकोनातून आयातशुल्काचा वापर करत भारत, चीन व अन्य देशांच्या बाबतीत जे धोरण स्वीकारले, त्यातून या देशांनी एकत्र येत जागतिक व्यापारात सहकार्य वाढविण्याचे धोरण स्वीकारल्यास ते स्वाभाविकच म्हणावे लागेल.**

# निवडणूक इच्छुक उमेदवारांची गणेशोत्सवात मोर्चेबांधणी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर होणार आहेत. त्यामुळे इच्छुक उमेदवारांची मोर्चेबांधणी आतापासूनच सुरू झाली आहे. त्याची सुरुवात गणेशोत्सवात पहायला मिळते. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परिसरात प्रवेशद्वार उभारून त्यावर विविध राजकीय पक्षांच्या इच्छुक उमेदवारांचे फोटो लावण्यात आले आहेत, तर काहींनी बॅनर लावून आपली प्रसिद्धी करण्याची संधी साधली आहे. आतापर्यंतच्या इतिहासात सर्वात जास्त प्रवेशद्वार व बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना यंदा तरी गणेशोत्सव साजरा करण्यात अडचण आली नाही.





सुरुवातीला कोरोनामुळे आणि त्यानंतर तांत्रिक अडचणीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर गेल्या. सर्वच ठिकाणी प्रशासकीय राजवट आहे. निवडणुका आज होतील, उद्या होतील या आशेवर अनेक इच्छुक उमेदवार गुढग्याला बाशिंग बांधून तयार आहेत. निवडणूक होणार यासाठी अनेकांनी गेल्या चार–पाच वर्षात अनेक उपक्रम राबविले. भाऊबीजेला साड्या वाटल्या. मोफत आरोग्य शिबिरे घेतली. विविध सणांना बॅनर किंवा प्रवेशद्वारांच्या माध्यमातून फोटोबाजी करून आपल्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू होता. याचे कारण सतत चर्चेत राहणे. या नादात लाखो रुपये खर्च झाले, परंतु निवडणुका जाहीर होत नव्हत्या. लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या आणि इच्छुक उमेदवारांच्या आशा पल्लवीत झाल्या.

**खबरबात**
**विजय मांडे**

दिवाळीनंतर म्हणजे साधारण नोव्हेंबर, डिसेंबरला निवडणुका होतील असे जाहीर करण्यात आले. त्या दृष्टीने आरक्षणे, नगर परिषदांची प्रभाग रचना जाहीर झाली. ३१ डिसेंबरपर्यंत हरकती, सूचना करण्याची मुदत होती. म्हणजे निवडणुका होणार हे निश्चित झाले आहे.

यंदा गणेशोत्सव मंडळाचे चांगले दिवस आले आहेत. शहरात नगर परिषद निवडणुकीसाठी, तर ग्रामीण भागात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. कर्जत नगर परिषदेची निवडणूक वर्षाअखेरीस किंवा नवीन वर्षाच्या सुरुवातीला होणार असल्याने गणेशोत्सवात इच्छुक उमेदवारांनी प्रवेशद्वारावर आपले फोटो झळकवित गणेशभक्तांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या आहेत.


गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध गणेशोत्सव मंडळाना कार्यक्रमांचे प्रयोजकत्व दिले आहे. काहींनी आपल्या नेत्यांच्या बरोबर फोटो झळवलेली आरतीची पुस्तके गणेशोत्सवाच्या आधी स्वतः घरोघर जाऊन दिली आहेत, तर काहींजण आप आपल्या प्रभागातील घरगुती गणेशोत्सवांना कार्यकर्त्यांच्या समवेत भेटी देऊन दर्शन घेत आहेत.

गणेशोत्सवानंतर येणाऱ्या नवरात्री उत्सवालासुद्धा अशाच प्रकारे प्रवेशद्वार, बॅनर लावून आपली छबी लोकांसमोर कशी येईल याची धडपड सुरु होईल तसेच येणाऱ्या दिवाळीलादेखील आपले फोटो असेलेल्या पाकिटात उटणे देणे, भाऊबीजेनिमित्त साड्या वाटणे, लहानग्यांना फटाके वाटणे असे प्रकार झाले तर नवल वाटून घेण्याचे काही कारण नाही. यंदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत, म्हणून गणेशोत्सव किंवा नवरात्री उत्सव मंडळांना आर्थिक चणचण भासणार नाही.

# ...म्हणून साजरा होतो जागतिक नारळ दिवस

दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि त्याची मागणी लक्षात घेऊन, २ सप्टेंबर १९६९ रोजी एशियन आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी सुरू झाली. जकार्ता, इंडोनेशियात या दिवशी –झउउची स्थापनादेखील झाली. आपल्या देशात अनेक शतकांपासून नारळाचे आध्यात्मिक आणि औषधी मूल्य आहे. याला जर निसर्गाने दिलेली भेट म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नारळाच्या प्रत्येक भागाला खूप महत्त्व आहे. हे उशीरा पचवणारा, मूत्राशय साफ करणारा, ग्रहण करणारा, पौष्टिक, शक्तिशाली, रक्ताविरोधी, जंतुनाशक, जंतुनाशक आणि वात–पित्त नष्ट करणारा आहे. त्याच्या थंड प्रभावामुळे, त्याचे पाणी सर्व शारीरिक समस्यांपासून आराम देते.

नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटलं जातं. त्यापासून निर्माण होणाऱ्या सगळ्या गोष्टी या मनुष्याला उपयोगी पडतात. नारळ हा त्यापैकीच एक. नारळाचा उपयोग खाण्यासाठी, ओषधांसाठी, तेलासाठी तसेच इतर अनेक गोष्टींसाठी केला जातो. नारळाच्या शेतीपासून जगातल्या अनेक देशांत चांगला रोजगार मिळत आहे. त्यामुळे नारळाचे महत्व आणि त्याचा वापर याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ सप्टेंबर हा जागतिक नारळ दिन म्हणून साजरा केला जातो.



जागतिक नारळ दिन हा सर्वप्रथम २००९ साली एशिया–पॅसिफिक प्रदेश म्हणजे आशिया–प्रशांत महासागराच्या प्रदेशातील समुदायाकडून साजरा करण्यात आला. जागतिक स्तरावर नारळाच्या शेतीबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्याला प्रोत्साहन देणे हा उद्देश जागतिक नारळ दिन साजरा करण्यामागे आहे. त्यामुळे नारळाच्या व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकेल.

जगभरात नारळाचे उत्पादन घेतले जाते, पण आग्नेय आशियात त्याचे सर्वाधिक उत्पादन घेतलं जातं. नारळाच्या उत्पादनाच्या बाबतीत इंडोनेशियाचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातही कोकण किनारी, गुजरात पासून ते केरळपर्यंत आणि पूर्व किनाऱ्याच्या पश्चिम बंगालपासून ते तामिळनाडूपर्यंत नारळाचे उत्पादन घेतलं जातं.

### नारळाचे फायदे

अगदी तहान भागवण्यापासून ते फर्निचर तयार करण्यापर्यंत नारळाचे असंख्य असे फायदे आहेत. नारळामध्ये कार्बोहायड्रेट्स, मॅगनिज आणि प्रोटिन मोठ्या प्रमाणावर असतं. त्यामुळे आपले आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. म्हणूनच आजारी व्यक्तींना नारळाचे पाणी प्यायचा सल्ला दिला जातो. नारळाचे दूध आणि तेल हे आपल्या त्वचेला ग्लो आणण्यासाठी फायदेशीर आहे. नारळामध्ये आयर्न आणि सेलेनियम असते. ते एक ॲन्टिऑक्सिडन्ट स्वरुपात काम करते, त्यामुळे लाल रक्त पेशींचे संरक्षण होते.

नारळ खाल्याने कोलेस्टोरॉलचा स्तर सुधारतो. नारळात व्हिटॅमिन, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक असतात. त्यामुळे ब्लड प्रेशर नियंत्रणात येतं. नारळाचे पाणी रोज पिल्यास शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण स्थिर राहतं. **(साभार : इंटरनेट)**




# आधार कार्डमधील माहिती घरबसल्या करा अपडेट

अनेकांना आधार कार्ड काढून बरीच वर्ष झाली असतील. २०१६च्या नियमानुसार व्यक्तींनी त्यांच्या आधार नोंदणी तारखेपासून दर १० वर्षांनी आधार कार्ड अपडेट केले पाहिजे. हे ५ आणि १५ वर्षांच्या मुलाच्या ब्लू आधार कार्डवर बायोमेट्रिक माहिती अपडेट करण्यासाठीदेखील लागू होते.




आता युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाने अलीकडेच मोफत आधार कार्ड अपडेट करण्याची व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करण्याची अंतिम मुदत १४ जून होती ती आता १४ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे.

नाव, पत्ता, जन्मतारीख, वय, लिंग, मोबाइल नंबर, ई–मेल पत्ता, रिलेशनशिप स्टेटस, इन्फॉर्मेशन शेरिंग कॉन्सेंट आदी गोष्टी तुम्ही अपडेट करू शकता.

अधिकृत वेबसाईटला भेट द्या : सगळ्यात पहिला UIDAI म्हणजे भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणच्या अधिकृत वेबसाइटवर uidai.gov.inवर जा. दिलेल्या पर्यायांमधून तुमच्या सोयीनुसार भाषा निवडा. ॲक्सेस अपडेट फिचर : 'माय आधार' टॅबवर क्लिक करा आणि ड्रॉप–डाउन मेनूमधून 'अपडेट युवर आधार' हा पर्याय निवडा. अपडेटसह पुढे जा : तुम्हाला 'अपडेट आधार डिटेल्स (ऑनलाईन)' पेजवर नेले जाईल. प्रक्रिया सुरू करण्यासाठी Document Updateवर क्लिक करा. युआयडी क्रमांक टाका : तुमचा युआयडी क्रमांक, कॅप्चा व्हेरिफिकेशन कोड तिथे टाका. तुमच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर वन–टाइम पासवर्ड (OTP) येण्यासाठी 'ओटीपी पाठवा'वर क्लिक करा. लॉग इन करा : ओटीपी मिळाल्यानंतर लॉग इन करा. ओटीपी एंटर करा व अकाउंट एक्सेस करण्यासाठी 'लॉग इन'वर क्लिक करा. अपडेटेड माहिती भरा : तुम्हाला जी माहिती अपडेट करायची आहे ते निवडा व नवीन माहिती अचूक भरून घ्या. डॉक्युमेंट सबमिट करा : आवश्यक बदल केल्यानंतर 'सबमिट'वर क्लिक करा. तुमची माहिती अपडेट करण्यासाठी आवश्यक असलेले स्कॅन डॉक्युमेंट्स अपलोड करा. रिक्वेस्ट नंबर प्राप्त होईल : नंतर Submit Update Requestवर क्लिक करा. सबमिशन केल्यावर तुम्हाला एसएमएसद्वारे अपडेट रिक्वेस्ट नंबर (URN) प्राप्त होईल, जो तुम्ही अपडेट ट्रॅक करण्यासाठी वापरू शकता. ओरिजिनल कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करून १४ सप्टेंबरपर्यंत तुम्हाला my-adhaar पोर्टलवर विनामूल्य आधार कार्ड अपडेट करता येईल. त्यानंतर मात्र तुम्हाला शुल्क भरावे लागेल.

# ख्यातनाम संगीतकार श्रीनिवास खळे

ख्यातनाम संगीतकार श्रीनिवास विनायक खळे यांचा आज स्मृतिदिन. त्यांनी आपल्या कर्णमधुर आणि भावपूर्ण गीतांनी मराठी रसिकांना सहा दशकांहून अधिक काळ मोहिनी घातली होती. ते खळेअण्णा या नावानेही ओळखले जायचे.




**निमित्त**

श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी गुजरातमधील बडोदा येथे झाला. पूर्वी दादरच्या एका चाळीतल्या जागेत खळे कुटुंब राहायचे. गावाकडच्या मालमत्ता वा तत्सम कारणांमुळे मुंबई सोडावी लागली. संपूर्ण कुटुंब बडोद्याला स्थायिक झालं. बडोद्यातल्या सयाजीराव गायकवाड संगीत महाविद्यालयातच मधुसूदन जोशी यांच्याकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले. पुढे अता हुसेन खाँ, निसार हुसेन खाँ आणि फैयाज हुसेन खाँ यांच्यासारख्या दिग्गजांकडून त्यांना शास्त्रीय संगीताची तालीम मिळाली.

बडोदा आकाशवाणीत संगीतकार म्हणून काही वर्षे नोकरी केल्यानंतर खळेअण्णा मुंबईत आले, पण त्यांना काम मिळेना. या काळात त्यांना त्यांच्या एका मित्राची मोलाची मदत झाली. त्याच्यामुळे राहण्या–खाण्याची सोय झाली. इथेच त्यांची ओळख के. दत्ता (दत्ता कोरगावकर) या संगीतकाराशी झाली. खळ्यांनी मग कोरगावकरसाहेबांचे सहाय्यक संगीतकार म्हणून काम करायला सुरुवात केली. याच काळात काही चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाच्या स्वतंत्र संधी त्यांच्याकडे चालून आल्या, मात्र ते चित्रपट कधीच पूर्ण झाले नाहीत आणि खळेसाहेबांचे सगळे कष्ट पाण्यात गेले. त्यामुळे त्यांना विलक्षण नैराश्य आले होते. आपल्या जवळची बाजाची पेटी विकून टाकून संगीताला रामराम ठोकावा आणि काही तरी दुसराच नोकरीधंदा शोधावा अशा टोकाच्या निर्णयाप्रत ते आले होते, पण अशा वेळी त्यांच्या पत्नीने त्यांना धीर दिला आणि या प्रसंगातून त्यांना सुखरूप बाहेर काढले. बऱ्याच हालअपेष्टांनंतर १९५२ साली त्यांची 'गोरी गोरी पान' आणि 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख' दोन गाणी असलेली पहिली तबकडी प्रसिद्ध झाली. आशा भोसले यांची तिच्यातील ही गीते तेव्हा खूप लोकप्रिय झाली आणि त्याबरोबर श्रीनिवास खळे हे नावदेखील. या दोन्ही रचना ग.दि. माडगुळकर यांच्या होत्या. मुळात या रचना लक्ष्मीपूजन चित्रपटासाठी होत्या, पण ऐनवेळी हा चित्रपट मूळ निर्मात्याऐवजी दुसऱ्याच एका निर्मात्याने बनवून त्यात संगीतकार म्हणून खळ्यांना घेतलेच नाही, पण खळ्यांनी लावलेल्या ह्या गीतांच्या चाली गदिमांना इतक्या आवडल्या होत्या की, त्यांनी त्यांची एचएमव्हीकडून एक वेगळी तबकडी बनवून घेतली. या दोन्ही गाण्यांनी खळ्यांना खऱ्या अर्थाने प्रसिद्धी दिली आणि मग खळे एक संगीतकार म्हणून मान्यता पावले.

हिंदी, संस्कृत, गुजराती, बंगाली इत्यादि भाषांमधील गीतांना खळेअण्णांनी जरी स्वरबद्ध केले असले तरी त्यांचे खरे योगदान हे मराठी भावगीत यामध्ये आहे. भावगीतांव्यतिरिक्त 'बोलकी बाहुली', जिव्हाळा', 'पोरकी', 'पळसाला पाने तीन' यासारख्या निवडक सहा मराठी चित्रपटांना त्यांनी संगीत दिले तसेच लता मंगेशकर, पं. भीमसेन जोशी या दिग्गजांना घेऊन त्यांनी 'रामश्याम गुणगान' हा गीतसमूह संगीतबद्ध केला होता. १९६८ सालादरम्यान आकाशवाणीतली नोकरी सोडून 'एचएमव्ही' या मातब्बर म्युझिक कंपनीत ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून सूत्रे हाती घेतली. २ सप्टेंबर २०११ रोजी ते निवर्तले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुमच्या डोळ्यांचा रंग आरोग्याबद्दल सांगतो...

तुम्ही अनेकदा ऐकलं असेल की, डोळे म्हणजे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतो. डोळ्यांखाली काळी वर्तुळं तयार होणं ही मोठी सौंदर्य समस्या आहे. ही वर्तुळं का तयार होतात हे समजून न घेता त्यावर फक्त कॉस्मेटिक उपाय केले जातात, पण त्यामुळे काळ्या वर्तुळांची समस्या सुटत नाही; उलट ती आणखी तीव्र होते. डोळ्यांखाली काळी वर्तुळं निर्माण होण्यास एखादं विशिष्ट कारणच कारणीभूत असतं असं नाही, तर काळ्या वर्तुळांच्या समस्येमागे अनेक कारणं करतात. त्यातील बरीचशी कारणं ही जीवनशैली आणि सवयींशी निगडित असतात. दरम्यान, याची कारणं आणि त्यावर उपचार कसे करावेत याबाबत बोलताना गुजरात, डॉकट्यूबचे सदस्य डॉ. जगदीश सखिया यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



डॉ. जगदीश सखिया यांच्या म्हणण्यानुसार डोळ्यांचा रंगदेखील बदलतो आणि रंग बदलण्याची विविध कारणं असू शकतात तसेच तुमच्या डोळ्यांचा रंग तुमच्या आरोग्याबद्दल काय सांगतो? हेदेखील जाणून घेऊ.

काहींच्या डोळ्यांचा रंग थोडासा गुलाबी असतो. त्याचं कारण असं की, विषाणूजन्य संसर्ग, ॲलर्जी किंवा चिडचिडेपणामुळे असा रंग होऊ शकतो. त्यावर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेणं गरजेचं आहे.

हिमोलेक्रिया : हा एक दुर्मिळ आजार असून त्यामध्ये रुग्णाच्या डोळ्यांतून रक्ताचे अश्रू येतात. अश्रूंमधून रक्तस्राव ही एक वैद्यकीय स्थिती आहे, ज्याला हेमोलेक्रिया म्हणतात. ही स्थिती रक्तरंजित अश्रू म्हणून ओळखली जाते. ही एक दुर्मिळ स्थिती आहे. त्यात अश्रूंचा रंग काहीसा लाल असू शकतो किंवा पूर्णपणे रक्तस्राव होऊ शकतो. जर तुम्हाला रक्तरंजित अश्रूंशिवाय इतर कोणतीही लक्षणं, जसे की डोळ्यातील अस्वस्थता किंवा वेदना जाणवत असतील, तर लगेच वैद्यकीय उपचार घ्या.

पिंग्यूकुलाचे सर्वांत सामान्य व महत्त्वाचे लक्षण म्हणजे पांढऱ्या भागावर पिवळा डाग दिसणे. गंभीर प्रकरणांमध्ये तो शस्त्रक्रिया काढून टाकणे आवश्यक असू शकते.

हेटेरोक्रोमिया म्हणजे बुबुळाचा रंग बदलणे किंवा बुबुळाच्या रंगद्रव्यावर परिणाम करणारी परिस्थिती यांसारख्या दुर्मिळ स्थिती उद्‌भवणे.

म्हणूनच डोळ्यांचा रंग बदलत असेल तर सावधान व्हा आणि आवश्यक ती काळजी घ्या.

# पनवेल महापालिका क्षेत्रात ४५००पेक्षा जास्त पाच दिवसांच्या गणपतींना निरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सुमारे ४ हजार ६५८ पेक्षा अधिक पाच दिवसाच्या घरगुती गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा ६.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग,पर्यावरण विभाग या ८ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटना देखील महापालिकेस सहकार्य करत आहेत.

यावर्षी महापालिकेच्यावतीने एकुण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर,निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली आहे.

दरम्यान विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार सर्व उपायुक्त व सहाय्यक आयुक्त ,प्रभाग अधिकारी व कर्मचारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचे निरीक्षण केले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटांवर गणपतींचे सुरळीत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभाग , आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी सेवा देण्यात येत आहे.



### निर्माल्य संकलन रथ

पालिका क्षेत्रातील गणेश मंडळाच्या दारात जाऊन दररोज निर्माल्य गोळा करण्यासाठी महापालिकेने विशेष 'निर्माल्य संकलन रथ' तयार केले आहेत. या निर्माल्य संकलन रथाच्या माध्यमातून दररोज निर्माल्य संकलन केले जात आहे. या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यात येणार आहे. विसर्जन काळात स्वच्छतेसाठी पथके तयार करण्यात आली आहेत.

## तरुणीशी जवळीक केल्याप्रकरणी रिक्षाचालकावर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षाचालकाने एका तरुणीशी जवळीक साधण्याच्या उद्देशाने तिचा मोबाईल क्रमांक मागून मैत्री करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी या रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही तरुणी इंजिनीअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. परीक्षा असल्याने ती कॉलेजमध्ये गेली. त्यानंतर रिक्षात बसून खारघर येथे जाण्यास निघाली. या वेळी रिक्षाचालकाने तिच्याशी ओळख वाढवण्याचा प्रयत्न केला. या वेळी पैसे पाठवण्यासाठी स्कॅनर मागितला असता, स्कॅनर देण्यास रिक्षाचालक टाळत होता. त्यानंतर त्याने उद्या आपण जेवायला बाहेर जाऊ, असे बोलून त्या मुलीकडे नंबर मागितला, मात्र त्या मुलीने वडिलांचा मोबाईल नंबर दिला आणि ती मुलगी हॉस्टेलमध्ये निघून गेली.

दरम्यान, तिने तिच्या वडिलांना ही घटना सांगितली. काही वेळाने त्या रिक्षाचालकाचा तिच्या वडिलांना फोन आला, मात्र त्यांनी तो उचलला नाही. ही बाब तिने हॉस्टेलमधील वॉर्डनला सांगितली. त्यानंतर या रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्याते तक्रार दिली.

## एकाच रात्री पाच दुकाने फोडली

**पनवेल** : एकाच रात्री खारघर वसाहतीमध्ये ५ दुकाने फोडल्याने परिसरात भीतीयुक्त वातावरण आहे . खारघर वसाहतीमध्ये राज टॉवर येथे असलेल्या ग्लोबल सिरॅमिक , रामदेव स्वीट अँड फरसाण मार्ट , देवराज फ़्लायवूड , मेडिकल स्टोर व डेंटल क्लिनिकचे शटर तोडून अज्ञात चोरटयांनी आत प्रवेश करून लाखो रुपये किमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम लंपास केली असून सदर चोरीचा प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे .

## वृद्धाचे सात तोळे सोने घेऊन तोतया पोलीस पसार

**पनवेल : वार्ताहर**

६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला दोन अज्ञात व्यक्तींनी पोलीस असल्याची बतावणी करीत त्यांचे सात तोळे सोन्याचे दागिने घेऊन पसार झाल्याची घटना घडली. याप्रकरणी दोन अज्ञात तोतया पोलिसांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरीष माने कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे राहतात. आठ दिवसांपूर्वी गोदरेज सिटी,पनवेल येथे त्यांच्या मुलीकडे राहण्यास आले होते. पहाटेच्या वेळी ते रस्त्यावर मॉर्निंग वॉक करत असताना दुचाकीवरून दोन अज्ञात व्यक्ती आल्या व त्यांनी ते सीआयडी पोलीस असून, या भागात तपासणी सुरू केली असल्याचे त्यांना सांगितले.

तुम्ही तुमच्या अंगावरील दागिने काढून खिशात ठेवा, असे सांगून त्यांनी आपले ओळखपत्र दाखवले. त्यावर माने यांनी सोन्याची चेन, कडे आणि अंगठी काढून त्यांच्या टी–शर्टच्या खिशात ठेवली. मात्र, या दोघांनी त्यांना दागिने खिशात ठेवू नका, रुमालात गुंडाळून ठेवा, असे सांगत त्यांनी हे दागिने रुमालात ठेवण्याचा बहाणा करीत रुमाल घेत पलायन केले.

## एटीएम कार्डची अदलाबदल करून एकाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

एटीएम कार्डाची अदलाबदली करून त्याद्वारे ५३ हजार रुपये काढून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उषा राजभर या त्यांच्या आईचे एटीएम कार्ड घेऊन कळंबोली येथे पैसे काढण्यासाठी गेले. पैसे काढत असताना एक इसम आत मध्ये आला आणि मला पैसे काढायचे आहेत तुम्ही लवकर पैसे काढा असे बोलला. या वेळी त्याने राजभर यांचा एटीएम पिन पाहिला. पैसे काढत असताना त्या इसमाने कार्ड काढून त्यांच्याकडे दिले.या वेळी त्या व्यक्तीने त्याच्याकडिल एटीएम कार्ड मशीन मध्ये टाकून काहीतरी चेक करून तो निघून गेला. त्यानंतर त्यांच्या वडिलांच्या मोबाईल वेगवेगळे एटीएम मधून काढण्याचे मेसेज आले.

## टास्क पूर्ण करण्यास सांगून पाच लाखांची फसवणूक

**पनवेल: वार्ताहर**

टास्क पूर्ण करण्यास सांगून व पैसे मिळण्याचे आमिष दाखवत पाच लाख तीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ऋषिकेश उपाध्याय हे कामोठे सेक्टर २० येथे राहतात. त्यांना टेलिग्राम ग्रुपमध्ये जॉइन करून पाच हजार रुपये गुंतवल्यास सात हजार रुपये मिळतील, असे सांगण्यात आले. त्यावर त्यांनी ही रक्कम भरताच त्यांना टास्कवर सात हजार रुपये आल्याचे दिसले असता, ते पैसे काढण्यास गेले असता, टास्क अर्धवट सोडून चालणार नाही, पुढचा टास्क पूर्ण करा, असे सांगत त्यांच्याकडून पाच टास्क पूर्ण करण्यासाठी एकूण पाच लाख तीस हजार रुपयांची रक्कम ट्रान्सफर करण्यास सांगितली. त्यानंतर त्यांना पैसे पाहिजे असतील तर चार लाख भरा तरच पैसे मिळतील, अन्यथा ते पैसे कधीच मिळणार नाहीत, असे त्यांना सांगण्यात आले. याप्रकरणी तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## दुचाकीसह डिलिव्हरी पार्सलची चोरी

**पनवेल :** दुचाकीसोबत त्यावर ठेवलेल्या ४० डिलिव्हरी पार्सलची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्ष अहमद हा तळोजा फेस २ येथे राहत असून, शॅडो फिक्स या कंपनीत पार्सल डिलिव्हरीचे काम करतो. तो दुचाकीवरून पार्सल देण्यासाठी आसावरी सोसायटीत गेला होता. त्याने पार्किंगमध्ये गाडी पार्क केली आणि पार्सल देण्यासाठी बिल्डिंगमध्ये गेला. मात्र, तेथून तो परत आला तेव्हा त्याची दुचाकी तसेच त्यावर ठेवलेले २० हजार रुपये किमतीचे ४० पार्सल गायब असल्याचे त्याला आढळले.


## ड्रायव्हर पाहिजे

**फॉर्च्युनर कारसाठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई–४१०२०६

**संपर्क**
**मोबाईल : ८१०८४००२१४**
**Email : ekanathpatil4141@gmail.com**


## तुकाराम कोळी परिवाराची ६४ वर्षांची गणेशोत्सव देखावा परंपरा



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मधील गेली ६४ वर्षे गणेश भक्तांना वेगवेगळ्या देखाव्याचे शोभित करणारे तुकाराम कोळी परिवार यांनी या वर्षी रक्तबीज वध या देखाव्यात रंगत आणलेली आहे.

हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले तुकाराम कोळी परिवार यांच्या श्री गणपतीची सजावट श्री साई आर्टस् कल्याण, रमेश जाधव, गणेश जाधव यांची आहे. पडदा पेंटींग रमेश डुकरे, निवेदक, अथर्व गोडबोले, तर विद्युत रोषणाई जनार्दन केणी, सुरज भोईर, नवीन पनवेल यांनी साकारल्याची माहिती माजी उपनगराध्यक्ष मदन तुकाराम कोळी व कोळी कुटूंबियांनी दिली

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

रोहन बेहरा (वय २६) असे या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

रोहन हा त्याच्या दुचाकीने खारघर सेक्टर २० येथील मासळी बाजारात साहित्य खरेदीसाठी गेला असताना त्याच्या दुचाकीला भरधाव कारने धडक दिली. त्यामुळे तो दुचाकीसह रस्त्यावर पडल्याने जखमी झाला असुन या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात कार चालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## लॅपटॉप व रोकड चोरीप्रकरणी खारघर पोलिसांत गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**




रियल इस्टेटचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाच्या कार्यालयातून लॅपटॉप आणि ५० हजार रुपये रोख चोरीला गेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रकांत भोसले हे खारघर सेक्टर १२ येथे राहतात. त्यांचा खारघार सेक्टर २० येथे रिअल इस्टेटचा व्यवसाय आहे. ऑगस्ट महिन्यात त्यांना प्रसाद परब याने कॉल करून कल्याणी कावसकर हिचे भाड्याने घेतलेले दुकान रिकामे करण्याची धमकी देत त्यांना कार्यालयात येण्यास सांगितले. भोसले दुकानाकडे गेले असता, दुकानाचा बॅनर फाटलेला तसेच दुकानाला लावलेले कुलूप जागेवर निसल्याचे आढळले.

यामुळे त्यांनी दुकान उघडून पाहिले असता, दुकानात ठेवलेला लॅपटॉप आणि ५० हजार रुपये गायब असल्याचे आढळले. त्यावर त्यांनी खारघर पोलीस ठाणे गाठून या प्रकरणी तक्रार दाखल केली.

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**परिशिष्ट – १०**
**(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी / जाहीर सूचनेचा नमुना–मराठी)**
**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५**

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :–

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर,२०२५ |
| २. | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात.) | बुधवार, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ ते सोमवार, दिनांक १५ सप्टेंबर,२०२५ (दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

**टिप : हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.**

ठिकाण :– पनवेल
दिनांक :– ०१/०९/२०२५

**सही/–**
**(मंगेश चितळे)**
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४२७/४३४/२०२५

## पनवेलच्या विकासावर निबंध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेश कोळी संपादित सा. पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर पनवेल या विषयावर खुल्या गटासाठी निबंध स्पर्धा आयोजिण्यात आली आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निबंध स्वलिखित स्वरूपात पीडीएफ फॉरमॅटमध्ये panveltimesgmail.com या मेलवर अथवा ९३२२३३९७९७ या व्हॉट्सअॅप नंबरवर पाठविता येईल. निबंधाची शब्दमर्यादा १५०० शब्द इतकी ठेवण्यात आली आहे.विजेत्यांना पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिन सोहळ्यात पारितोषिके देण्यात येतील. अधिक माहितीसाठी ९३२२३३९७९७ या क्रमांकावर संपर्क साधावा,

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
Tal. Panvel, Dist. Raigad. Pin No. 410 206

**CORRIGENDUM**

**QUOTATION NOTICE (REVISED DATES)**

Sealed quotations are invited by Panvel Municipal Corporation from the reputed agencies or registered contractors of the Govt. department for the work of :

1. Fabrication and Supply of 55 Meters Height Hydraulic Platform fully compliant with EN-1777 norms for Fire Fighting and Rescue Operations
2. Fabrication and Supply of 28 Meters Height Hydraulic Platform fully compliant with EN- 1777 norms for Fire Fighting and Rescue Operations

For Fire Service Department of Panvel Municipal Corporation. This notice will also available at website https://www.panvelcorporation.com/ & in the office of Chief Fire Officer, Panvel Municipal Corporation, Opp. Gokhale Marriage Hall, Panvel - 410 206.

The updated schedule for sealed quotations in physical form of submission will be accepted from **Dt.02/09/2025 to 09/09/2025 up to 03:00 p.m.** in the office of the Chief Fire Officer, Panvel Municipal Corporation, Opp. Gokhale Marriage Hall, Panvel - 410 206 and will be opened on **Dt.10/09/2025 at 04:00p.m.** or as decided by Panvel Municipal Corporation. The quotations are called for estimation purpose only.

Outword No.: Pmc/Fire/
S.N./1538/2025
Date: 01-09-2025

**Signed by**
**(Kailas Gawade)**
Dy Municipal Commissioner
Panvel Municipal Corporation

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| १ | तळोजा ४८९ | ८२ | २४०/१+३/१ | ०–५७–३ | ९५० चौ.मी. | भूखंड क्र. २०, सेक्टर–१७, क्षेत्र–९५० चौ.मी. | १) श्री. नारायण आंबो नेरूळकर<br>२) श्री. रघुनाथ आंबो नेरूळकर<br>३) श्री. अर्जुन लक्ष्मण नेरूळकर<br>४) श्री. विष्णू दत्तात्रेय नेरूळकर | निरंक |
| | | ११२ | २३७/३ | ०–५३–६ | | | | |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | १–१०–९ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
१२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/२३६/२०२५–२६**


अरुण चिमण, भोस्ते, श्रीवर्धन


कर्जत रेल्वेचा राजा


मनोहर धोत्रे, मोहोपाडा, खालापूर


प्रदीप गोंधळी, हातनोली, खालापूर


सीताराम राऊत, शिळोली, सुधागड

# वृद्धेचा खून करणाऱ्या आरोपीला बेड्या

## माणगावमधील घटनेचा उलगडा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील येरद गावात घडलेल्या खळबळजनक खून व चोरी प्रकरणाचा उलगडा करत पोलिसांनी आरोपीला अवघ्या काही दिवसांत अटक केली आहे. कल्पेश बबन जाधव (वय २२, रा. येरद आदिवासीवाडी, ता. माणगाव) असे आरोपीचे नाव आहे.

पाणी मागण्याचा बहाणा करून जबरी चोरीसाठी घुसलेल्या आरोपीने फिर्यादी यांच्या घरात घुसून संगीता मनोहर मोकाशी (वय ७०) यांना मारहाण केली. त्यानंतर कानातील, गळ्यातील, हातातील सोन्याचे दागिने तसेच मोबाईल घेऊन आरोपी पसार झाला. या मारहाणीमुळे महिलेचा मृत्यू झाला होता.

घटनेनंतर माणगाव पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. गुप्त बातमीदारांकडून माहिती गोळा करण्यात आली तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपीचा शोध घेण्यात आला. रेशन आणण्यासाठी येरद गावात आलेल्या आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्याला माणगाव येथील न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याचे काम सुरू आहे.

## कॅनरा बँकेच्या पेण शाखेचे उद्घाटन



**पेण : प्रतिनिधी**

कॅनरा बँकेच्या पेण शाखेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील आणि बँकेचे मुख्य महाप्रबंधक रंजीव कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पाटील यांनी पेण विभागात मोठा आर्थिक विकास होणार असून बँकेच्या प्रगतीसह तालुक्यातील नागरिकांचाही आर्थिक विकास होईल, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास उपमहाप्रबंधक रजनिश कुमार, उपमहाप्रबंधक दीपक सक्सेना, सहायक महाप्रबंधक शंकर एस.राव, शाखा प्रबंधक आनंदराव पालवे, राजश्री पाटील, गौतम पाटील, दर्शन बाफना, रवींद्र म्हात्रे आदी उपस्थित होते. बँकेत एटीएम तसेच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळ्या काउंटरची सुविधा आहे.

## रोह्यात रक्तदान, आरोग्य शिबिराला उत्तम प्रतिसाद

**रोहा : प्रतिनिधी**

एक गाव एक गणेशोत्सव ही लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेली संकल्पना गेली १०४ वर्षे अविरतपणे जतन करणाऱ्या रोह्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टतर्फे रविवारी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत रक्तदान व आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. अर्पण रक्तपेढी मुलुंड शाखा अष्टमी यांच्या सहकार्यातून आयोजित केलेल्या या शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला.

आरोग्य शिबिरात रोह्यातील कदम वेलनेस क्लिनिकच्या डॉ. कांचन कदम यांनी स्किन व हेयर संबंधित रुग्णांची मोफत चिकित्सा व समुपदेशन केले, तर अष्टमी सेंटरच्या डॉ. भूमी शेट्टी यांनी रुग्णांचे मोफत जनरल चेकअप केले.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष अमेय जोशी, माजी अध्यक्ष चंद्रकांत पार्टे, निखिल दाते, ट्रस्टचे पदाधिकारी हर्षद भाटे, भारत वाकचौरे, चैतन्य आठवले, सुमित रिसबुड, शिवराज भांड, नागेश पाटणकर, सोहम बारटके, रविराज मेहेंदळे, चैतन्य भावे आदींसह सर्व कमिटी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.



## पेण खारेपाटात गौरी नाचवण्याची परंपरा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारेपाट विभागात माहेरवाश महिलांकडून गौर नाचवण्याची शेकडो वर्षांची परंपरा आजही आहे. दुपारी १२ वाजता गौरीची आरती झाल्यावर रात्री गौरीजवळ महिलांचा नाच होतो. या वेळी गौरीची पारंपरिक गीते म्हटली जातात.

गौराईला विसर्जनाला नेताना गौरीच्या पाटाला हात न भजन गात एक ते दीड तास गौर डोक्यावर घेऊन नाचतात. त्यामध्ये वढावच्या शकुंतला म्हात्रे व अहिल्या म्हात्रे, वाशीच्या संगीता पाटील, भालच्या कांचन म्हात्रे, भाल विठ्ठलवाडीच्या सरिता अशोक म्हात्रे, बोर्झे येथील निशा कृष्णा म्हात्रे या सगळ्या गौर डोक्यावर नाचवतात.

काही भागात गौरीला मालभूय म्हणजेच माळ दाखवताना काही महिला गौरीच्या पाटाला हात न लावता दोन्ही हात सोडून शिडीच्या पायऱ्यांची चढ-उतार करतात. झोपाळ्यावर बसून गौरीच्या पाटाला हात धरत झोपल्यावर झोके देतात. झोपाळ्यावर महिलांबरोबर गौरीच्या पाटाला हात न धरता भवर नाच नाचतात.

## खोपोलीत साबळे फाउंडेशनतर्फे घरगुती गणपती आरास स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**खोपोली : प्रतिनिधी**



सातत्याने सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या विक्रम यशवंत साबळे फाउंडेशन आयोजित गणेशोत्सव घरगुती सजावट स्पर्धेमध्ये असंख्य गणेश भक्तांनी सहभाग घेतला नोंदवला होता. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक ११,१११ रुपये व उत्कृष्ट चषक, द्वितीय क्रमांक ७७७७ व चषक व तृतीय क्रमांक ५५५५ व चषक प्रदान करण्यात आला अनुक्रमे अर्णव घारे, साईश सुनील पुरी आणि राजाराम कुंभार यांना. यशवंतशेठ साबळे फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष विक्रम साबळे यांच्या हस्ते प्रत्येकाच्या घरी जाऊन त्यांना पारितोषिक देण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक अविनाश तावडे, भाजप महिला मोर्चा खोपोली अध्यक्ष अश्विनी अत्रे, माजी शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, हेमंत नांदे उपस्थित होते. भविष्यातही अशाच स्पर्धा आयोजित करण्याचा मानस साबळे यांनी व्यक्त केला आहे.

## श्रीवर्धनमध्ये पारंपरिक बैठक नृत्याची धूम



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात गणेशोत्सवानिमित्त पारंपरिक कलांचा उत्सव साजरा झाला. शिवसेना शहर संघटनेतर्फे आयोजित भव्य बैठक नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या कार्यक्रमात राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी हजेरी लावून कलावंतांचे मनोबल वाढवले.

स्पर्धेनंतर आपल्या भावना व्यक्त करताना मंत्री गोगावले म्हणाले, कोकणात अनेक पारंपरिक नृत्य प्रकार पाहिले, मात्र इतक्या शिस्तबद्ध आणि देखण्या पद्धतीने सादर होणारे बैठक नृत्य प्रथमच अनुभवले. हे नृत्य पाहून मन प्रसन्न झाले. गणेशोत्सव हा हिंदू धर्मातील सर्वात मोठा सण असून या निमित्ताने कोकणातील सांस्कृतिक परंपरा उजागर झाली आहे.

स्पर्धेत एकूण नऊ संघांनी सहभाग नोंदवला होता. प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट, ढोल-ताशांचा नाद आणि रंगतदार सादरीकरणामुळे प्रेक्षक खुश झाले. प्रथम क्रमांक एकविरा क्रीडा मंडळ, जीवनेश्वर आळी, द्वितीय क्रमांक श्री गणराय वंदन दांडा मित्र मंडळ, तर तृतीय क्रमांक विंचवादेवी नाच मंडळ, जीवनेश्वर आळी यांनी पटकाविले.

स्पर्धेचे परीक्षण विश्वास कोसबे, सुनील चांदविडकर, कुमार बाक्कर, अशोक माने व अप्पा तुरे यांनी केले. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उपजिल्हाप्रमुख मोरे, संपर्क प्रमुख सचिन पाटेकर, ओमकार शेलार यांच्यासह शहरप्रमुख सावन तवसाळकर, माजी शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे, संघटक राजेश चव्हाण तसेच समीर केळकर, सचिन सावंत, ओमकार बोरकर, अमेय करदेकर आदी उपस्थित होते.

## डॉ. नेल्सन मंडेला आश्रमशाळेत भटके विमुक्त दिन साजरा

**नागोठणे : बातमीदार**



महाराष्ट्र शासनाच्या वतीने ३१ ऑगस्ट हा पहिलाच भटके विमुक्त दिन यंदापासून साजरा करण्यात येत असून याच अनुषंगाने नागोठणे येथील डॉ.नेल्सन मंडेला निवासी आश्रमशाळेत हा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी रायगड जिल्हा तथा सहाय्यक संचालक मोनिका काळे, संस्थेचे चेअरमन डॉ.जी.के. डोंगरगावकर, नागोठणे ग्रामपंचायत सदस्य ॲड. प्रकाश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते धनराज उमाळे, ॲड. गणेश कांबळे, अविनाश भोसले, शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ डोंगरगावकर, शिक्षिका जयश्री उमाळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करण्यात आले. या वेळी आपल्या मनोगतात मोनिका काळे यांनी भटके विमुक्त यांच्याविषयी माहिती सांगून हा विशेष दिन राज्यातील शासकीय शाळा, कार्यालयात साजरा होत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

ग्रामपंचायत सदस्य ॲड. प्रकाश कांबळे यांनी भटके विमुक्त दिन आणि भटके विमुक्त सामाजाला सामाजिक न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजेत, असे मत मांडले. संस्थेचे चेअरमन डॉ. डोंगरगावकर यांनी कोकणातील भटके विमुक्त सामाजातील अनेक प्रश्न व समस्या यावर मार्गदर्शन केले.

# कर्जत तालुक्यात तब्बल २६१९ गौरींचे पूजन

## सुवासिनींनी परंपरा जपत घेतला ओवसा

**कर्जत : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात गौरी गणपती सणाला फार महत्व आहे. या सणाला कुठेही असलेला माणूस आपल्या घरी येतो. गणरायाच्या प्राणप्रतिष्ठे नंतर दोन-तीन दिवसांनी गौरीचे आगमन होते. काही ठिकाणी फुलांच्या, तर काही ठिकाणी मूर्तींच्या गौरींचे पूजन करण्यात येते. त्यानंतर घरातील व शेजारील सुवासिनी गौरीचा ओवसा घेतात. हा सोहळा उत्साहात पार पडला.

यंदा कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३५१, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२५७, माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ अशा २६१९ गौरींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

गणेश चतुर्थीला श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. कुणी दीड दिवसांनी, कुणी पाच दिवसांनी, कुणी गौरींबरोबर, कुणी वामन नवमी, तर कुणी अनंत चातुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जन करतात, मात्र गौरींचे आगमन एकाच वेळी होते. कुणी मूर्तीची गौर पूजतातम तर कुणी आदल्या दिवशी पहाटेच रानात जाऊन गौरी पूजनाच्या पूर्वसंध्येपर्यंत कचोऱ्याची फुले (गौरीची फुले) व तेरड्याच्या फुलांसकटच्या फांद्या आणतात.

यानंतर महिला रात्रभर गाणी गात गौर सजवण्यात गुंततात साडी नेसवून गौर सजवून त्यावर मुखवटा आणि पुठ्ठ्याचे हात लाऊन खुर्चीवर गौर बसवितात. कुणाच्या उभ्या गौरी, तर कुणाच्या नाचऱ्या गौरी असतात. हल्ली गौरींचा मूर्ती आणण्याचे प्रमाण वाढले आहे. या गौरींच्या मूर्ती पूजनाच्या दिवशी आणल्या जातात. काही ठिकाणी त्या वाजत गाजत आणतात. त्यांचे पूजन मात्र सारख्याच पद्धतीचे असते.

दुपारी गौरीचे पूजन झाल्यावर घरातील सुवासिनी नटून थाटून सुपामध्ये पूजेचे साहित्य घेऊन गौरीचा ओवसा घेतात. विशेष म्हणजे नववधूने हा ओवसा घेतलाच पाहिजे असे परंपरेनुसार ठरलेले आहे. या वेळी त्यांनी उकडलेल्या पिठांचे दिवे लाऊन गौरींना ओवाळले. या सोहळ्याचा आनंद बहुतांश घरातील सुवासिनींनी घेतला. बऱ्याच ठिकाणी केवळ गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. गौर आणली जात नाही. काहींची गौर एकच असते अशा ठिकाणी सारे कुटुंबीय गौराई असलेल्या मोठ्या घरी एकत्रित झाले आणि गौरी पूजन करून ओवासा घेऊन आनंद लुटला.

## मोर्बा पाच गाव ग्रुपतर्फे वर्षावास मालिका

**माणगाव : बातमीदार**

बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ८ पाच गाव ग्रुप मोर्बो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोर्बा बौद्ध विहारात वर्षावास मालिका हा कार्यक्रम मोठ्या आनंदात व उत्साहात झाला. या वेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील बुध्दमय भारत निर्माण करण्यासाठी बहुजन समाजाचे राष्ट्रव्यापी संघटन या विषयावर प्रवचनकार डॉ.धनराज वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास माणगाव तालुका बौध्दजन पंचायत समितीचे चिटणीस आर.डी. साळवी, सहचिटणीस रंजित मोहिते, कोषाध्यक्ष सुरेंद्र जाधव, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. नरेश जाधव, निलेश साळवी, विवेक जाधव, राजू कासारे, पाडुंरग मोरे, पत्रकार उत्तम तांबे आदी उपस्थित होते.

या वर्षावास मालिका कार्यक्रमाचे अध्यक्ष बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र ८. पाच गाव ग्रुप मोर्बा विभाग संदेश विजय साळवी हे होते. या वेळी माजी समाजकल्याण सभापती अशोक गायकवाड, उपाध्यक्ष प्रवखप हाटे, दुय्यम उपाध्यक्ष राजेंद्र मोरे, चिटणीस गंगाधर जाधव, उपसचिव भाऊ ओव्हाळ, खजिनदार यशवंत गायकवाड, मोर्बा स्थानिक माजी अध्यक्ष प्रशांत मोरे, भोजनदानवाले सचिन जाधव, बंडू मोरे, प्रकाश ओव्हाळ, संतोष जाधव तसेच सर्व उपासक उपासिका, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



